# नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई व मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण
## यांच्या संयुक्त विद्यमाने
## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा — २०२६ निमित्त आयोजित
## कविता लेखन स्पर्धेचा निकाल

| प्रवेशिका क्रमांक | स्पर्धकाचे नाव | पदनाम | न्यायालय क्र. /विभागाचे नाव | निकाल |
|---|---|---|---|---|
| क—१७ | श्री हेमंत यशवंत जोशी | लिपिक—टंकलेखक | खर्डा विभाग | प्रथम |
| क—२२ | श्री संतोष तानू सरमळकर | सहा. प्रबंधक | अपिल विभाग | व्दितीय |
| क—१० | श्री हिरालाल द. कराडे | शिपाई | न्यायालय क्र. १०, दिंडोशी न्यायालय | तृतीय |
| क—१ | कुमारी विनंती घन:श्याम धुमाळ | लिपिक—टंकलेखक | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई | उत्तेजनार्थ |
| क—३३ | श्री आदित्य विलास सावंतदेसाई | लिपिक—टंकलेखक | भांडारकक्ष विभाग, दिंडोशी न्यायालय | उत्तेजनार्थ |

दिनांक :

(श्री चकोर बाविस्कर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश

(श्री सुनिल पाटील)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश

क-१७

नाव - हेमंत यशवंत जोशी
पद - लिपिक टंकलेखक
विभाग – खर्डा
भ्रमणध्वनी - ९१५८११८३७२

# || भारतमाता ||

जन्मदायिनी ममतामयी
आई भारती शिश नमवू |
क्रांती जन्मली प्रथम जिथे
मन्मनी तिचे गुण गाऊ ||

ऋतूंमागे ऋतू म्हणती
चारूगात्री ही माता फुलवू |
ओज जिचे हे इंद्रजाल जणू
निर्मिकाचा आहेर समजू ||

धूर्त ध्वनी जरी थोतांड माजवी
अभिभव ज्याचा निश्चीत करू |
अशुभ अभद्र खलबतांना
वर्मी भेदून विच्छीन्न करू ||

प्रतिव्दंव्दीची हिंस्त्रक धाटी
आमुचीही मग प्रगल्भ तारू |
रणकंदन हे वीर विक्रमी
तुमुल युयुत्सेने शमवू ||

मनोरथ मग्रूर दैत्यांचे
क्षणार्धी उन्मलून देऊ |
कलभांड कुकर्मी राक्षस फिरती
त्यांसी साष्टांगी नमवू ||

गोत्रज सारे मग उत्सव करिती
सुस्वर साचर जगी घुमवू |
स्वतंत्र भूमाता सुलक्षणी
अखंड भारती मग म्हणवू ||

कोणी नीच ना उच्च कोणी
स्नेह ऐक्याचा सेतू बांधू |
ध्वज भारतभूचा दिसतो सुंदर
उत्तुंग आकाशी झळकवू ||

-------

क-२२

श्री. संतोष तानू सरमळकर
सहाय्यक प्रबंधक, अपिल विभाग,
मुंबई नगर दिवाणी व सत्र
न्यायालय, मुंबई
दूरध्वनी क्र : 9892361507

# निसर्ग कविता–"सांज'

फुलपाखरू हिंडतसे, गर्द हिरव्या वनात ।

असे शोधीत मकरंद, भ्रमर पुष्पांच्या तनात ॥

वारा खोडकर जरी, खेळे संगतीत पानांच्या ।

गोड कोकीळेची कुहूकुहू, नाचे आत मौनाच्या ॥

शुभ्र धवल एकटा, हा मेघ गगनी हसरा ।

कोण चिमुकला पक्षी, असे शोधीत आसरा ॥

जल चंचल उथळ, छपत्या रवीच्या गर्तेत ।

दंग केशरी गगन, जणू भुईच्या वार्तेत ॥

गत आयुष्याच्या स्वप्नी, दूर रमले देवालय ।

वृध्द वट हा ध्यानस्थ, भवती छायेचे वलय ॥

रडक्या भूमीत राबणारे, पाय वळलेत घरा ।

स्वागतार्थ अंधाराच्या, दीप प्रकाशतो खरा ॥

चालता थकुनी रवी, मिटण्यां गिरीच्या कुशीत ।

हर्ष सांजेच्या विरे, काळया रात्रीच्या भितीत ॥

काळया रात्रीच्या भितीत................

हिरालाल द. कराडे.
शिपाई,
दिंडोशी विभाग,
कोर्ट क्र. १०.

क-१०

# निसर्ग

ऐकुनी निसर्गगाज
मन पाखरू होऊन जाई
अनंत आभाळासवे
जीवनगाणी गात जाई ॥ धृ ॥

क्षितिजाच्या पलीकडून
हाक देता दिवसाचा दूत
पक्षी गाती भूपाळी
जागा होईल ईश्वराचा सुत
अंध:कार संपूनिया पुन्हा
उषःकाल साद देई
अनंत आभाळासवे
जीवनगाणी गात जाई ॥ १ ॥

कधी थेंबात कधी वाऱ्यात
पाऊस येई मृदगंधात
नेसूनी शालू हिरवा
धरती नटे नववधूवेषात
वसुंधरेसाठी वरूण

सृजनाचे गीत गाई
अनंत आभाळासवे
जीवनगाणी गात जाई ॥ २ ॥

भ्रमर करी गुंजारव
फोडी कठीण लाकडासी
देहभान विसरतो परी
पाहता नाजुक कमळासी
त्यागुनी स्व:प्राणाला
अमरप्रेमाची ग्वाही देई
अनंत आभाळासवे
जीवनगाणी गात जाई ॥ ३ ॥

वारा नेतो लाटेला
किनाऱ्याच्या दिशेने
सागर खेची आत तिला
विरहाच्या भीतीने
असफल प्रीतीचा
निरंतर खेळ चालत जाई
अनंत आभाळासवे
जीवनगाणी गात जाई ॥ ४॥

राहो अशीच प्रकृती
निसर्गात समतोल राहो
मानवी हस्तक्षेपाविना
अधिक बहरत जावो
पान फुल फळांचा

वृक्षवल्लींचा आवाज येई
अनंत आभाळासवे
जीवनगाणी गात जाई ॥ ५ ॥

क-१

**संपूर्ण नाव** : कु. विनंती घन:श्याम धुमाळ
**पदनाम** : लिपिक टंकलेखक
**न्यायालयीन विभागाचे नाव** : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई
**कविता विषय** : देशभक्तीपर
मोबाईल क्रमांक : ९७०२३१७५४८

## भारताचे संविधान

भारताचे संविधान हे जनतेसाठी स्वातंत्र्य असुनी ।
एक आधार देऊनी जाई ।
समानतेचा विचार करूनी ।
एक स्तब्ध अधिकार मिळवून जाई ।।

सर्व भारतवासी एकत्र येऊनी ।
न्याय, स्वातंत्र, बंधुता घडवूनी जाई ।
धर्म जात न पाहूनी ।
समानतेचा हक्क देऊनी जाई ।।

प्रत्येक व्यक्तीसाठी अधिकार आणि कर्तव्य सांगुनी ।
नवा भारत घडवूनी येई ।
कायद्याच्या चौकटीत राहूनी ।
सर्वांना समान आधार देऊन जाई।।

विकासाच्या दिशेने संघटित होऊनी ।
कर्तव्याचा दीप उजळूनी जाई ।
संविधानाचा स्वातंत्र जनतेसाठी असुनी ।
एका किरणेची आशा दाखवून जाई ।।

संविधानाने भारताची ओळख ही मिळवूनी ।
शांततेच्या प्रतिक आम्हा देऊन जाई ।
एकतेने भारताचा मान पुढे दिसूनी ।
महान असा संविधान जीवनाची दिशा दाखवून जाई ।।

नाव - आदित्य विलास सावंतदेसाई, पदनाम - लिपिक-टंकलेखक
Name: भांडारक्ष विभाग, दिंडोरी Class: ______ Div.: ______ Roll No.: ______
Subject: ______ Topic: ______ Date: ______ Page No.: ______

क-३३

# "आई"

नऊ महिने गर्भात सांभाळून, जन्म तिने दिला
झोपवण्यासाठी हाताचा, पाळणा तिने केला
अशा माऊलीचे उपकार कधी, फेडता येणार नाही ओ
आई सारखी माया जगात, कोठेच मिळणार नाही हो ॥१॥

घेता जन्म जगामध्ये या, नव्हते भूकेचे भान
स्तनपान करून माऊलीने दिले, अमृततुल्य दान
आईच्या पदरात मिळणारी ऊब, कोणत्याच वस्त्रात नाही ओ
आई सारखी माया जगात, कोठेच मिळणार नाही हो ॥२॥

आई म्हणजे घरात वसलेले, राजकारणा विरहित गांव
ठेच लागताच प्रत्येकाच्या तोंडी, आपसूक येणारं नाव
न सांगताही वेदना समजणारं तिच्याशिवाय कोणी नाही ओ
आई सारखी माया जगात, कोठेच मिळणार नाही हो ॥३॥

आई म्हणजे जीवनामध्ये, मुकद्याच मिळणारी ठेव
मनरूपी मंदिरामधला, स्वयंभू असलेला देव
सर्व तिर्थक्षेत्रांचे पुण्य तिच्या, सेवेमध्येच आहे ओ
आई सारखी माया जगात, कोठेच मिळणार नाही हो ॥४॥

सांगे 'आदि' जीवनामध्ये, आईचा शब्द मोडू नका
वृद्धकाळात गरज असताना, साथ तिची सोडू नका
माऊली शिवाय जन्म घेणे, देवांनाही जमले नाही ओ
आई सारखी माया जगात, कोठेच मिळणार नाही हो ॥५॥

धन्यवाद...

KOHINOOR